# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १९ जानेवारी २००९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

सोमवार दिनांक १९/०१/२००९ रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.२-१० वा.वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला उपआयुक्त श्री.उध्दव घुगे नगर सचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालिका सदस्य उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भाऊसाहेब बाबुराव वाघ
०२. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०३. स.स.श्री.गजानन रामकिशन बारवाल
०४. स.स.श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
०५. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०६. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०७. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०८. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
०९. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१०. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
११. स.स.श्री.जेम्स अंबिलढगे
१२. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१३. स.स.सौ.विजयाताई बनकर
१४. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१५. स.स.श्रीमती मसरद बेगम शरफोद्दीन
१६. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१७. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१८. स.स.श्रीमती जोशी रजनी रमेश
१९. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२०. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२१. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२२. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपत
२३. स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी
२४. स.स.श्रीमती रगडे सुशिला भगवान
२५. स.स.श्रीमती मिराताई रामराव शिंदे
२६. स.स.श्रीमती पाटील दिपाली सुनिल
२७. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
२८. स.स.श्रीमती खान मेहरून्नीसा खान हमीद
२९. स.स.श्रीमती मिटकर शोभा हरीश्चंद्र
३०. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३१. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन

३२. स.स.श्री.अब्दुल रशीद खान (मामु)
३३. स.स.श्रीमती लता श्रीनिवास दलाल
३४. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडूरंग
३५. स.स.श्री.संजु रिडलॉन
३६. स.स.श्रीमती सिध्द वीणा गजेंद्र
३७. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनूस
३८. स.स.श्री.शेख इब्राहीम शेख इमाम
३९. स.स.श्री.हाजी शेर खान अ.रहेमान
४०. स.स.श्रीमती मुमताज बेगम वाहेद खान
४१. स.स.श्रीमती राऊत छाया विलास
४२. स.स.श्री.दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर
४३. स.स.श्री.अशोक गोरखनाथ विरकर
४४. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४५. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४६. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
४७. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफिज
४८. स.स.श्री.संतोष सुधाकरराव जेजुरकर
४९. स.स.श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे
५०. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
५१. स.स.श्रीमती खान जहुराबी नासेर
५२. स.स.श्रीमती बोरामणीकर कला सुरेश
५३. स.स.श्री.डॉ.कराड भागवत किसनराव
५४. स.स.श्रीमती मंगला प्रकाश गायकवाड
५५. स.स.श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य
५६. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५७. स.स.श्रीमती रेखा कैलास काथार
५८. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५९. स.स.श्रीमती पाटणी हर्षमाला विजयकुमार
६०. स.स.डॉ.बिनवडे आशा उत्तमराव
६१. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
६२. स.स.श्रीमती जयश्री किवळेकर
६३. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६४. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६५. स.स.श्रीमती सरिता ससाणे अशोक
६६. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
६७. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
६८. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६९. स.स.श्रीमती वाघमारे पार्वताबाई विजय
७०. स.स.श्रीमती जाधव संगिता विठ्ठलराव
७१. स.स.श्री.विसपुते शशांक दामोधर
७२. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७३. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७४. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा

७५. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७६. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७७. स.स.श्री.संजय पांडूरंग शिरसाट
७८. स.स.श्रीमती अल्पा विकास जैन
७९. स.स.श्रीमती मोमीन सफिया फिरदोस अय्युब खान
८०. स.स.श्रीमती अनिता नंदकुमार घोडेले
८१. स.स.श्री.विनोद सोनवणे

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.किशोर तुलशीबागवाले
०३. स.स.श्री.राजेश (पप्पू)व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल

**चर्चा :**

श्री.अ.रशिद खान मामू : स.११-३० वा.सुरू होणारी सभा २-०५ वा. सुरू होते. आता चर्चा होणार सभा उशीरा सुरू करण्याचे कारण काय?

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : सभेची ११.३० वेळ होती. आता २.०५ झाले.सभा तहकुब करावी.

श्री.सतीष कटकटे :ज्यांचेकडे आयुक्त पदाचा प्र.चार्ज होता ते यापूर्वी सभेला उपस्थित राहत होते यावेळेसही ज्यांचेकडे आयुक्तांचा प्र. चार्ज आहे ते आतापर्यंत आलेले नाही त्यांनी यावे की नाही याचा खुलासा करण्यात यावा.

श्रीमती मेहरून्निसा खान: नेहरू नगर डी.पी.रोडचे काम व्हावे.

याच वेळी मा.महापौर डायस समोर अनेक स.सदस्य मोठमोठयाने बोलतात.

मा.महापौर :सर्व प्रश्नाचा खुलासा घेतला जाईल ही पध्दत बरोबर नाही डायस समोर असलेल्यांनी जागेवर बसावे.

श्री.कैलास गायकवाड :दरवर्षी स.सदस्य व अधिकारी यांचेसाठी डायरी दिली जाते त्यात श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालय,डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र,तसेच मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्रचा फोटो छापला जातो ज्या अधिकाऱ्यांनी हेतूपुरस्कर छत्रपती यांचा अपमान करण्याचा प्रयत्न केलेला आहे त्या अधिकाऱ्याची चौकशी करून त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी.

याच वेळी डायस समोर अनेक स.सदस्य मोठमोठयाने बोलतात.डायरी फाडतात घोषणा देतात.

मा.महापौर :सर्वांनी शांत रहावे आपले म्हणणे एकूण घेता येईल डायस समोरील सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे ही पध्दत बरोबर नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :सभेला अगोदरच उशीर झालेला आहे असा गोंधळ होत असेल तर सभा तहकूब करावी.

श्री.कैलास गायकवाड :ज्या अधिका-यांनी यात कसूर केलेला आहे त्यांची चौकशी करून कार्यवाही व्हावी.

श्री.मिलींद दाभाडे :डॉ.बाबासाहेब आंबेडकर,छत्रपती शिवाजी महाराज यांचे नावावर आपण सर्व निवडूण आलेलो आहोत त्या महापुरूषांचा अवमान होत असेल तर या गोष्टींचा आम्ही धिक्कार करतो. संबंधीतावर कार्यवाही व्हावी.

याच वेळी मा.महापौर डायससमोर अनेक स.सदस्य मोठमोठयाने बोलतात स.सदस्य श्री.सलीम खान व श्री.मिलींद दाभाडे डायरी जाळण्याचा प्रयत्न करतात.

श्री.अ.रशीद खान : ऐनवेळेवर कोणतेही प्रस्ताव घेवू नये.

मा.महापौर :सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे. डायरी जाळण्याचा प्रयत्न होत आहे.आपण सभागृहात आहे याचे भान सभागृहाची शान सर्व सदस्यांनी ठेवावी ही पध्दत बरोबर नाही.

श्री.देसरडा प्रशांत :गेल्या दोन-तीन महिण्यापासून विषयपत्रिकेवर चर्चा झालेली नाही. विषयपत्रिका सुरू करण्याच्या अगोदरच स.सदस्य डायस जवळ येवून मोठमोठयाने बोलतात गोंधळ करतात म्हणून सभा तहकूब करावी लागत असते.परंतू आपणांस विनंती आपण विषयपत्रिका सुरू करावी.

यावेळीही व्यासपीठासमोर अनेक सदस्य मोठयाने बोलत असतात.

मा.महापौर :आपण सर्वांनी जागेवर बसावे तरच रूलींग देता येईल.

श्री.मिलींद दाभाडे :छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे फोटो डायरीमध्ये का छापले नाही याचा प्रशासनाने खुलासा करावा.

मा.महापौर :सर्व प्रश्नाचा खुलासा मिळेला एका नंतर एक सदस्यांनी बोलले पाहिजे त्यानंतरच खुलासा घेता येईल.

श्री.सय्यद खुसरो :स.११-३० वा.सुरू होणारी सभा दु. २-१०वा. सुरू झाली खुपच उशीर झाला सभा तहकूब करावी.

मा.महापौर :डायस समोरील सर्व सदस्यांनी जागेवर बसावे सर्वाचा खुलासा मिळेल.

श्री.प्रशांत देसरडा :विषयपत्रिकेला सुरूवात करावी.

श्री.सय्यद खुसरो :बैठकीची वेळ ११-३० वा.होती आता २-१५ वाजले सभा तहकूब करावी.

मा.महापौर विचारलेल्या प्रश्नाचा श्री. कांबळे साहेब यांनी खुलासा करावा.

याच वेळी अनेक स.सदस्य महापौर डायस समोर येवून मोठमोठयाने बोलतात.

श्री.प्रशांत देसरडा :हा कोणताच विषय सर्वसाधारण सभेशी संबधीत नसतो. सभा होत नाही म्हणून शहराचा विकास थांबलेला आहे. आपण विषय पत्रिकेला सुरूवात करावी.

मा.महापौर :सर्व सदस्य आपल्याला वारंवार जागेवर बसण्याच्या सुचना केलेल्या आहे..जागेवर बसल्याशिवाय कोणताच खुलासा मिळणार नाही. विषयपत्रिकेला सुरूवात करण्यात येते

श्री.प्रशांत देसरडा :विरोधी पक्षाचे सदस्य सभा चालू झाल्यानंतर शहराच्या विकास कामात अडथळे आणत आहे.विषयपत्रिकेला सुरूवात करावी.

श्री.सतीष कटकटे. :आयुक्त पदाचा प्र.चार्ज कुणाकडे दिलेला आहे.

श्री.सलीम खान :वार्डात २ लक्षचे व इतर ही कोणतीही विकास कामे होत नाही.

मा.महापौर :आपण सर्व जागेवर बसावे खुलासा घेण्यात येईल.

श्री.सय्यद खुसरो :सभेची वेळ ११-३० वाजेची होती सभा दु.२-१० वा.सुरू झाली हे बरोबर नाही. सभा वेळेवर सुरू झाली नाही. त्यामागचे कारण काय,मागिल बैठकीत स्पील ओव्हरची कामे त्वरीत सुरू करावी असे आपण आदेशीत केले होते.ती कामे चालू झाली नाही. असे होत असेल तर सभा घेवून उपयोग नाही सभा तहकूब करावी.

श्री.अ.रशिद खान मामू: ११.३० ची सभा २.३० झाले सभा उशीरा सुरू होण्याचे कारण काय तीन तासात काय विकास झाला. तसेच आताच स.सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे डायरीमध्ये सदरचे फोटो का छापण्यात आलेले नाही. आयुक्त का नाही सर्व प्रश्नाचा खुलासा व्हावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :सभागृहात जे चित्र तयार करीत आहोत ते अत्यंत चुकीचे आहे.सर्व सदस्यांनी आपआपले मत जागेवरून माडांवे.सर्वाचे मत लक्षात घेवून

मा.महापौरांनी रूलींग दयावे. गेल्या तीन बैठकीपासून सभागृहात विकास कामाबाबत चर्चा होत नाही हे योग्य नसून सर्वांच्यासाठी त्रासदायक आहे.

श्री.रशिद खान मामू :विकास कामाचा प्रश्न होता तर तीन तास सभा उशीरा का सुरू केली.

श्री.सय्यद खुसरो रूलींग देवूनही अमलबजावणी होत नाही तर सभा घेवून उपयोग नाही.

श्रीमती मेहरून्नीसा खान:महापौर यांनी रूलींग देवूनही एक महिण्यात अंदाजपत्रक तयार होत नाही ज्यांनी कामे घेतली ते ठेकेदार कामे सुरू करीत नाही.

श्री.सतीष कटकटे :आयुक्तांचा पदभार कुणाकडे आहे.

श्री.संजय सिरसाट :आजची सभा स.११-३० वा. होती अनेक विषय चर्चेला येणार याची सर्व सदस्यांना कल्पना होती. दुर्दैवाने मागिल बैठकीत शिवसेना पक्षाचे एकही सदस्य सभागृहात उपस्थित नव्हते दुस-या दिवशी समजले की सभा अत्यंत शांततेत व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली प्र.आयुक्त बदली होवून गेले जास्तीत जास्त सभा ही ४५ मिनिटे चालली पाहिजे. असे त्यांनी म्हटले होते अडीच तास उशीरा सभा सुरू होते स.सदस्य चिडणे हे साहजिक आहे मागिल सभा आम्ही नसतांना जी शांततेत व खेळीमेळीच्या वातावरणामध्ये डॉ. कराड साहेबांनी पुढाकार घेवून सभा चालविली ते आज शांत का आहे यांचे कारण सुध्दा सभागृहा पुढे आले पाहिजे.आताच काही सदस्यांनी डायरीमध्ये फोटो का छापले गेले नाही, सभा सुरू होण्यास उशीर का झाला असे प्रश्न केले विनंती की सदस्यांनी आपआपल्या जागेवरून प्रश्न विचारावे त्यांचे उत्तर चांगल्या पध्दतीने दिले जावे. सभागृतील जे चित्र आहे ते पूर्ण उदया पेपरमध्ये येईल आयुक्त बंड गेले सभागृहात सदस्यांनी बंडपणा करायला सुरूवात केली असे चित्र येईल.

श्री.मिलींद दाभाडे :महापुरूषांचे फोटो का टाकण्यात आले नाही याचा खुलासा अगोदर करण्यात यावा.

मा.महापौर :प्रशासनाने खुलासा करावा.

सहा.आयुक्त -१ : महापालिकेची आर्थीक परीस्थिती बरोबर नाही त्यासाठी प्रत्येक बाबीवर कमीत कमी खर्च करायचा असा मा.आयुक्तांनी निर्णय घेतला डायरी छपाईसाठी ३.००,२.५०,लक्ष पर्यत खर्च होत होता या वर्षी फक्त ४२ हजार झालेला आहे.

श्री.मिलींद दाभाडे :फोटोसहीत किती खर्च लागणार होता याचा खुलासा करावा.

सहा.आयुक्त -१ :कलर फोटो टाकायचे नाही असा निर्णय घेतला होता.

श्री.मिलींद दाभाडे : मा.आयुक्तांनी डायरी मध्ये फोटो न टाकण्याच्या भुमिकेचा आम्ही निषेध करतो. मा.आयुक्त आल्या पासून महापालिकेत जेवढे आंबेडकर अनुयानी अधिकारी आहे त्यांचेवर जाणिवपुर्वक अन्याय केलेला आहे. आतापर्यंत ज्याही अधिका-यांच्या चौकशी केल्या ते सर्व मागासवर्गीय व दलीत होते.शहर अभियंता हे पदावर येथे अधिकारी असतांना शासनाचे मागविले मा.आयुक्त हे दलित विरोधी होते.

श्री.सतीष कटकटे :फोटो का छपाई केले नाही असा सदस्यांचा प्रश्न आहे त्यांचा खुलासा दयावा विषयाला वेगळे वळण देवू नये

सहा.आयुक्त-२ :यापूर्वी कुणाचेही फोटो नव्हते. जे होते ते घ्यायचे नाही असे मा.आयुक्तांचे डायरेक्शन होते.

श्री.कैलास गायकवाड :ज्या ज्या वेळी महापालिका डबघाईला आली त्या त्या वेळी सुध्दा महापुरूषाचे फोटो छापले गेले होते. जर महापुरूषाच्या फोटोसाठी असे होत

असेल तर आम्ही त्याचा निशेध करतो फोटो छापले नाही याचा खुलासा करावा मा.आयुक्ताचे काय आदेश होते.

सहा.आयुक्त-२ :कुठलाही फोटो छपाई करायचे नाही साधी डायरी छपाई करावी त्यापूर्वी तर असा निर्णय घेतला होता की डायरीच छपाई करायची नाही.

श्री.कैलास गायकवाड :४० हजार खर्च करून डायरीच छपाई करण्याची गरज नव्हती स..सदस्य त्यांचे खर्चाने डायरी घेवू शकत नव्हते का ? अधिकारी/नगरसेवक यांचेकडे एकदुसऱ्यांचे मोबाईल नंबर नव्हते का ४० हजार खर्च करून त्या महापुरूषाचां अपमान करण्याची काय गरज होती.जे अधिकारी यात दोषी आहे त्याची चौकशी करून त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :यापूर्वी सर्व फोटो असतील व या वर्षीच्या डायरीत आता कुणाचे फोटो आहेत.यापूर्वीच्या डायरीत कुणाचे होते ते आता नाहीत का ?

याच वेळी महापौर डायस समोर स.सदस्य गर्दी करतात आपआपसात बोलतात.

मा.महापौर :डायस समोरील सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे सर्व प्रश्नाचा खुलासा आपल्याला मिळेल.

श्री.सलीम खान :स.११-३० वा. सभा २-३० वा. तीन तास उशीरा सुरू केली विनंती आपण सभा तहकूब करावी. सभागृहात विकास कामाच्या संदर्भात चर्चा करीत होतो. विकास कामे होत नाही बजेट बुक बोगस तयार केले म्हणून जाळले होते एक दिवसासाठी सदस्यत्व रद्य केले होते

मा.महापौर :सभागृहात सर्व सदस्यांनी शांततेने बोलावे व ही सर्वाचीच जबाबदारी आहे.वारंवार सुचित करते की एका वेळेस एकाच स.सदस्यांनी बोलावे.

याच वेळी महापौर डायस समोर स.सदस्य मोठमोठयाचे आपआपसात बोलतात.

श्री.सलीम खान :ही सभा तहकूब करावी. शहर अभियंता पदाची येथे आवश्यकता आहे का त्या पदावर आलेले अधिकारी श्री.म्हस्के साहेब येथे काम करू शकतात का?

श्री.अ.साजेद अ.सत्तार : विषय पत्रिका मंजुर करा, सभा ८ दिवसासाठी तहकुब करा.

मा.महापौर : ही सभा पुढील सुचना मिळे पर्यंत तहकूब करण्यात येते.

पुढील सूचना मिळेपर्यंत सभा तहकूब करण्यात आल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.